International Indexed & Referred Research Journal, November, 2012, ISSN 0974- 2832, RNI- RAJBIL- 2009/29954; VoL IV * ISSUE- 46

शोध पत्र-मराठी

# प्रा. माधुरी शानभाग यांच्या स्त्रीवादी कथा- एक मिमांसा

November,2012

* सौ. कविता अरुण पाटील

* शाहू नगर, बी.एड. कॉलेज पठीमागे, मालेगाव, नासिक

प्रा. माधुरी शानभाग यांनी साहित्यानुभवाची अभिव्यक्ती करीत असता 'कथा' हा वाङ्मय प्रकार मोठ्या प्रमाणात हाताळला आहे. त्यांनी ललित कथा लेखन केले, त्याचप्रमाणे विज्ञानकथाही लिहिल्या आहेत. 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात लोकप्रिय झालेला 'चिकन सूप फॉर द सोल' या आकृतिबंधातील कथाही त्यांनी लिहिल्या आहेत. इ.स. 1998 ते 2010 या कालखंडात त्यांचे आठ ललित कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून त्यात कौटुंबिक कथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. कुटूंब, त्यातील नातेसंबंध व त्यातही स्त्रीचे जगणे, हे महत्त्वाचे असून कथांच्या केंद्रस्थानी स्त्री जीवन असल्याने 20 व्या शतकात प्रकट झालेली स्त्रीवादी विचारसरणी त्यात अभिव्यक्त झाली आहे.

अर्थात फक्त स्त्री जीवन तिच्या समस्या तिचे सुखदुःख यांच्या अभिव्यक्तिला स्त्रीवादी कथा म्हणता येत नाही, हे सत्य असले तरी स्त्रीवाद ही विचारप्रणालीच मुळात एक विचारावर, एका सत्त्वावर उभी राहिलेली विचारप्रणाली नसून ती बहुपेडी आहे. अनेक विचार, अनेक संकल्पना, दृष्टिकोन व तत्त्वप्रणाली यांचा अंतर्भाव तिच्यात झाला आहे. स्त्रीवादात अपेक्षित असलेली स्त्रीची स्वतंत्रतेची आकांक्षा, त्यासाठी तिने केलेला संघर्ष, तिने स्वतःचा घेतलेला आत्मशोध, त्यातून तिचे बदलणे हे प्रा.माधुरी शानभाग यांच्या कथांमधून दिसत असल्याने त्यांच्या कथांना स्त्रीवादी कथा म्हणावे लागते.

प्रा. माधुरी शानभाग यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील बदलत गेलेले स्त्रीजीवन स्वतः अनुभवलेले आहे, पाहिले आहे. गेल्या सहा दशकात त्यात खूप परिवर्तन घडून आलेले आहे. त्यांच्या संवेदनशील व प्रतिभावंत स्त्री मनाला त्यातील विविध विषयांनी सातत्याने मोहात पाडलेले दिसते. साहित्यिक म्हणून त्या त्यात ख—या अर्थाने प्रकट झालेल्या आहेत, असे म्हणावे लागेल. त्यांना अस्वस्थ करणा—या अनेक विषयांची मांडणी त्यांनी सगळ्यात सोप्या पण तेवढ्याच अवघड असलेल्या 'कथा' या वाङ्मय प्रकारातून केली आहे. विविध मासिकातून त्यांनी दिडशेवर कथा लिहिल्या आहेत. त्यात त्यांच्या काही विज्ञान कथा व काही 'चिकन सुप फॉर द सोल' या आकृतिबंधातील कथा आहेत.

पळसाची पाने, काचकमळ, चेहरे, चकवा, नीरसी मोहमाया, पुनर्वसन, समुद्र या कथासंग्रहात स्त्रीवादाचा पुरस्कार करायचा म्हणून त्यांनी कथा लिहिल्या नाहीत, तर काळानुरूप स्त्री व्यक्तिमत्वात जे बदल घडून आलेत त्याचे प्रकटीकरण करीत असता कळत न कळत स्त्रीवादी भूमिकेची अभिव्यक्ती त्यात झाली आहे. बदललेल्या जीवनानुरूप स्त्रीचे बदलणे, तिच्या समस्या व त्यांचे स्वरूपही बदलणे अपरिहार्य होते. हेच त्यातून स्पष्ट होते. प्रा. माधुरी शानभाग यांनी आपल्या काचकमळ, पुनर्वसन, समुद्र या कथासंग्रहाची मीमांसा करीत स्वतः कबूल केले आहे. की, स्त्री जीवन व तिच्या जगण्याच्या पाऊल खुणा, तिचे दुःख, तिचा संघर्ष हाच त्यांच्या कथांचा विषय आहे. त्यामुळे काचकमळाप्रमाणे स्त्रीची विविध रूपे त्यांच्या कथातून अभिव्यक्त झाली आहेत. प्रा. शानभाग स्वतः म्हणतात की, ''कथा ही माणसांची असते, घटनांची नसते'' तेव्हा त्यांच्या कथांचा विषय माणूसच आहे पण त्यातही स्त्रियांचा जेव्हा त्या एक माणूस म्हणून विचार करतात. तेव्हा त्यांना त्यांच्या भावजीवनात असंख्य विषय दिसतात. त्यामूळेच त्यांना 'पोटात शंख, शिंपले, रत्न, माणके, कोट्यवधी सजीव लपवून, दूरून अत्यंत मोहक दिसणारा समुद्र कुठेतरी स्त्रीशी साधर्म्य दर्शवतो असे वाटते व त्याला त्या शब्दात पकडू पाहतात.

प्रा. माधुरी शानभाग या जागतिकीकरणाच्या बदलणा—या जीवनशैलीच्या प्रतिनिधी असल्याने त्या दृष्टीनेच त्यांनी स्त्री जीवनविषयक चिंतनाची अभिव्यक्ती आपल्या कथांतून केली आहे. 'माहेर' मासिकाच्या तर्फे घेण्यात आलेल्या कथा स्पर्धेत त्यांच्या कथेला मालती दांडेकर 'सर्वोत्कृष्ठ लेखिका' हा पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या कथा ह्या कालानुरूप विकसित झालेल्या असल्या तरी त्यांच्या पहिल्याच 'पळसाची पाने' या कथा संग्रहात त्यांचा स्त्रीवादी दृष्टिकोन प्रकट झाला आहे. त्या कथासंग्रहाच्या 'उत्तररंग' कथेमधील सासू स्वतः आपल्या सुनेला 'माझा मुलगा असला तरी पुरूषांची जात आहे, वितळणार नाही असे होणार नाही, तूच थोडी धिटाई दाखवायला हवी' असा स्पष्टपणे सल्ला देते. तेव्हा ती पारंपरिकतेची चौकट निश्चितपणे मांडतांना दिसते. त्याचबरोबर दोन भिन्न व्यक्तिमत्वाच्या स्त्रिया घरदारावर किती भिन्न परिणाम घडवून आणू शकतात हे दाखवून स्त्री जीवनाचा सम्यक विचार करण्यास भाग पाडते तर 'काचकमल' या कथासंग्रहातील 'घन तमी शुक्र बघ' या कथेतील नायिका रेवा लग्नसंबंधात फसविली गेल्याने नव—यापासून घटस्फोट घेत स्वतंत्रपणे जगू पाहते. स्वतंत्रपणे जगत असता तिला येणारे अनुभव अत्यंत भयानक असतात. पत्रकारीतेच्या क्षेत्रात काम करणारी स्वाभिमानी स्त्री देखील शेवटी कोणाचा तरी आधार शोधू लागते पण पुरूष जातीचा आलेला अनुभव पाहता तिला सर्वार्थाने मदत करणारा पण समलिंगी संबंधाला बळी पडलेला विशाल सारख्या पुरूषाचा ती सोबती म्हणून डोळसपणे स्वीकार करतांना दिसते. 'एक नराच सोडून सर्व नाती निभावणारा सच्चा निर्मळ मनाचा मित्र' म्हणून ती त्याला स्वीकारताना दिसते. येथे

पारंपरिक स्त्रीची प्रतिमा बदलते. नवा विचार, नवी विचारप्रणाली स्वीकारलेली स्त्री अभिव्यक्त होते. 'शिकार' कथेतील कनका तर स्वतःच्या जगावेगळ्या वागण्याचे समर्थन स्पष्टपणे करताना दिसते 'जीवन संघर्षात शिकार व्हायचे की शिकारी हे आपले आपणच ठरवायला हवे' हे ठामपणाचे सांगत, ती स्वतःच्या जीवनात स्वच्छंदपणे जीवन जगू पाहते. 'जन्मभर संसारासाठी, मुलांसाठी नव—यासाठी स्वतः कष्ट करणा—या स्त्रिया तीला मान्य नाहीत. याला स्त्रीवादी प्रवृत्तीच म्हणावे लागते. स्त्रीवादाला अपेक्षित असलेले स्त्रीचे जगणे ती स्वीकारते आहे. हेच या कथेचे वेगळेपण आहे. 'चेहरे' या कथासंग्रहात बदललेली स्त्री मानसिकता व तिचा आत्मशोध महत्त्वाचा म्हणून सांगावा लागतो. स्त्री स्वातंत्र्याची अभिलाषा बाळगणा—या स्त्रीवादाचे एक वेगळे रूप, अंग त्यात अभिव्यक्त होताना दिसते 'चेहरे' कथेत आधुनिक जगातील स्वतंत्रतेने जगू पाहणा—या चार मैत्रिणी ह्या स्त्रीची, तिच्या शोषणाची एक वेगळी बाजू घेऊन येतांना दिसतात. त्या यशस्वी व सुखी असल्याचे दिसत असले तरी त्यांच्या हातून काय निसटले याची परखड चिकित्सा व शोध त्या स्वतःच घेताना दिसतात.

प्रा. माधुरी शानभाग यांचा स्त्रीवादी कथा लेखिका म्हणून निर्देश करीत असता त्यांचा 'चकवा' हा कथासंग्रह प्रामुख्याने लक्षात घ्यावा लागतो. 'चकवा' कथेतील कृष्णेला स्वतःला चाचपून पाहायला काही काळासाठी स्वतःच एकटीच अवकाश हवं आहे. तिच्या चुका सावरण्यासाठी 'चालतांना पायाला शेण लागलं म्हणाव अन् पुसून टाकाव' म्हणणारी वैनीबाय खरी स्त्रीवादी आहे. स्वतःच्या जीवनातले अनुभव सांगत ती तिला सावरते. तिच्या तोंडी आलेले स्त्रीवादाचे सार जीवनाचा वेगळेपणाने विचार करण्यास भाग पाडते. 'जंगल' ही कथा स्त्रीत्वाची अनुभूती, तिची लालसा, तिचे तृप्त होणे हे वेगळ्या परिभाषेत लेखिकेने मांडले आहे.

'जंगल' हा शब्दच मूळी त्यांनी वेगळ्या प्रतिमेसाठी वापरला आहे. स्त्रीवादी लेखनात ज्या वेगळेपणाची अपेक्षा केली जाते, ती ही कथा पूर्ण करतांना दिसते या कथा निश्चितच स्त्रीवादाचे दर्शन घडविणा—या कथा म्हणून सांगाव्या लागतात. स्त्रियांना स्वतंत्र होण्याची, वेगळे जीवन जगण्याची लालसा निर्माण होत असली तरी तो विचार त्या पूर्ण स्वीकारु शकत नाही ही त्यांची मर्यादा ठरते. या स्त्रीवादी मर्यादाही प्रा. माधुरी शानभाग यांनी बुद्धिवादी दृष्टिकोनातून व जीवनवादी भूमिकेतून स्पष्ट केल्या आहेत. हीच त्यांच्या लेखनाची विशेष बाब म्हणून सांगावी लागते. 'हे बंध मातीचे, काय भुललासी, नीरसी मोहमाया, कृष्णसखा, ते डोंगर तिथले हिरवे हिरवे बाई' या सारख्या कथांत आधुनिक स्त्रीची स्वतंत्रतेची व स्त्रीवादाची मर्यादा अधोरेखित होते 'ती एक माणूस आहे.' हेच एक महत्वाचे सत्य लक्षात घ्यावे लागते.

प्रा. माधुरी शानभाग यांच्या कथांमधून येणा—या स्त्रिया विविध काळातील असून विविध स्तरांवरील आहेत, स्वतंत्र आहेत, पण त्यांचे शोषण थांबलेले नाही, त्याचे स्वरुप बदललेले असले तरी ते संपले असे नाही. स्त्री विविध समस्यांना तोंड देत ती जीवन संघर्ष करीत आहे. स्वतंत्र होण्याची किंमत प्रसंगी तिला चुकवावी लागत आहे. प्रसंगी ती विद्रोहही करते तर कधी ती त्यातून पर्याय काढते. यातून असंख्य स्त्री जीवनाची रुपे सामोरी येतात. तिने केलेल्या बंडखोरीमुळे तिचे होणारे नुकसान, तिला मोडित काढून स्वतंत्रपणे, तर प्रसंगी स्वैरपणे जगू पाहणारी स्त्री यातील भेद यांच्या मर्यादाही त्यांनी परखडपणे व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेतून प्रकट होणारा स्त्रीवाद हा वेगळा आहे. स्त्रीचा आत्मशोध हा त्याचा पाया आहे.

अर्थात साहित्याच्या आविष्कारातील कोणत्या साहित्याला स्त्रीवादी म्हणता येईल हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. परंतु एवढे निश्चित म्हणता येईल की, मानव म्हणजे पुरुष, स्त्री हे त्याचे उपांग या विचाराला छेद देणारे, त्याबद्दल प्रश्न निर्माण करणारे, त्यात जटिलता, घुसरता मांडणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल. 'बाईच्या असण्याचा, होण्याचा समग्रतेने वेध घेणारे, तिच्या आत्मशोध प्रवास साहित्यिक आविष्कार म्हणून मांडणारे लेखनही स्त्रीवादी मानता येईल प्रा. माधुरी शानभाग यांचे साहित्य या निकषावरच स्त्रीवादी म्हणावे लागते अर्थात केवळ स्त्रीकेंद्री लिहिणे किंवा स्त्रियांच्या दुःखाच्या करुण कहाण्या पराभूत मनाने मांडणारे व स्त्रीत्वाचा उदोउदो करुन त्याला खतपाणी घालणारे साहित्य स्त्रीवादी होऊ शकत नाही हे निश्चित. पण स्त्री वा पुरुष असण्यातील निरर्थकता दाखवून एक रस, एक सत्व व्यक्तिमत्व संकल्पना नाकारुन मानवतावादापलिकडे घेऊन जाणारे साहित्य निश्चित उल्लेखनीय म्हणून निर्देशित करावे लागते. स्त्रीवादी साहित्याचा तो एक महत्त्वाचा टप्पा असून त्याची प्रतीती प्रा. शानभाग यांच्या कथांमधून येताना दिसते. स्त्री जीवनाची विभिन्न रुपे, स्त्रीवादाची विभिन्न अंग, प्रत्यागांसहित प्रगल्भ वैचारिकतेतून व मानवतेतून अभिव्यक्त होत जाणारी प्रा. माधुरी शानभाग यांची कथा स्त्रीवादाचे पुढचे पाऊल म्हणून निर्देशित करावी लागते तेच त्यांच्या कथा वाङ्मयाचे वैशिष्ट ठरते.

## संदर्भ ग्रंथ

1) डॉ. वरखेडे मंगला (संपा.) 'स्त्रीवादी समीक्षा संकल्पना व उपयोजन', का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे— आ. 1ली, 2, 1999.
2) डॉ. अश्विनी धोंडगे, 'स्त्रीवादी समीक्षा— स्वरुप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे 1993.
3) डॉ. मनोहर जाधव (संपा.) 'समीक्षेतील नव्या संकल्पना', स्वरुप प्रकाशन, आ. 1 ली, औरंगाबाद 2001.
4) विजया राजाध्यक्ष (संपा.) 'मराठी वाङ्मय कोश खंड चौथा समीक्षा— संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, आ. 1 ली, मुंबई 2002.
5) दै. लोकमत, शनिवार, 5 एप्रिल 2009.
6) सकाळ 21 नोव्हेंबर 2006 पान नं. 4
7) प्रा. माधुरी शानभाग, 'समुद्र', नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली, 1 ली आ. ऑगस्ट 2008
8) प्रा. माधुरी शानभाग, 'पळसाची पाने', प्रपंच प्रकाशन, पुणे 1ली, 1998
9) प्रा. माधुरी शानभाग, 'काचकमळ', नवचैतन्य प्रकाशन बोरिवली 1 ली, आ. ऑगस्ट 2002
10) प्रा. माधुरी शानभाग, 'चकवा', नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली, 1ली, आ, ऑगस्ट 2003.